# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८९/२०१८** **दिनांक ०५/११/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/१०/२०१८ ते ०५/११/२०१८) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/११/२०१८ सकाळी ८:३० पासून १०/११/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/१० | ३१/१० | ०१/११ | ०२/११ | ०३/११ | ०४/११ | ०५/११ | | ०६/११ | ०७/११ | ०८/११ | ०९/११ | १०/११ |
| ० | ० | ० | ० | ० | ०.२ | २७.६ | पाऊस (मिमी) | १२ | २ | ० | ० | ० |
| ३५.४ | ३५.२ | ३५.२ | ३५.० | ३४.८ | ३६.२ | ३५.८ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३५ | ३४ | ३३ |
| १५.० | १५.१ | १५.६ | १५.८ | १९.८ | २३.४ | २१.७ | किमान तापमान (अं.से) | २५ | २६ | २५ | २४ | २४ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ८ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ३ | ४ | ४ | ३ |
| ७२ | ७७ | ८६ | ८१ | ७९ | ८२ | ९६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७८ | ७३ | ७४ | ७७ | ६८ |
| २९ | २८ | २७ | ३९ | ६५ | ४८ | ४७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ५१ | ४२ | ४७ | ४६ | ४२ |
| १.५ | १.१ | १.९ | २.२ | १.५ | २.० | ३.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७ | ६ | ५ | ५ | ६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | ई. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. | ई.पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१८ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ३५१५.९ | ३४४२.२ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ६ व ७ नोव्हेंबर, २०१८ रोजी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ६ ते १० नोव्हेंबर २०१८ पर्यंत आकाश मेघाच्छादित राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पक्वता | • तयार झालेल्या भात पिकाची सकाळी 'वैभव" विळ्याने जमिनीलगत कापणी करून लगेच मळणी करून २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• खोडकिडीचा प्रादुर्भाव असलेल्या शेतातील भात पिकाच्या काढणी नंतर धसकटे गोळा करून नष्ट करावीत.<br>• रब्बी उन्हाळी भात लागवड करण्यासाठी रोपवाटिका तयार करण्याची पूर्वतयारीची करण्यास सुरवात करावी. |
| नागली | पक्वता | • तयार झालेल्या नागली पिकाची कणसे सकाळी विळ्याने कापून उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. |
| भुईमुग | पूर्व मशागत | • रब्बी भुईमुग लागवडीसाठी शेताची पूर्वतयारीची करण्यास सुरवात करावी. जमीन खोल नांगरून हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळावे. |
| कडधान्य पिके | पेरणी | • खरीप भात कापणी नंतर वालाची पेरणी करावयाची असल्यास २५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करून घ्यावी. |
| आंबा | पालवी | • आंब्याच्या कोवळ्या पालवीवर फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस १२.५ मि.ली. किंवा ३० टक्के प्रवाही डायमेथोएट १५ मि.ली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी पानाच्या खालच्या बाजूवर पडेल याची दक्षता घ्यावी.<br>• हलक्या स्वरुपाच्या पर्जन्यवृष्टी संभवत असल्याने, आंब्याच्या नवीन पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. या रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण किंवा ०.२५ टक्के कॉपरऑक्झीक्लोराइड २५ ग्रॅम किंवा ०.१ टक्का कार्बेन्डाझीम १० ग्रॅम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारावे. |
| काजू | पालवी | • काजूच्या नवीन फुटलेल्या पालवीवर ढेकण्याचा (टी मॉस्कीटो बग) आणि फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के प्रवाही १५ मि. ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के ६ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून पहिली फवारणी पालवी फुटण्याच्यावेळी करावी. |
| नारळ | फळधारणा | • नारळावरील इरीओफाईड कोळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के कडूनिंबयुक्त (अझाडीराक्टीन) कीटकनाशक ७.५ मि.ली. समप्रमाणात पाण्यात मिसळून मुळाद्वारे द्यावे. औषध दिल्यानंतर ४५ दिवसापर्यंत नारळ काढू नयेत. |
| सुपारी | -- | • कमाल तापमानात वाढ संभवत असल्याने, सुपारी बागेत ७ ते ८ दिवसाच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| भाजीपाला/ फळबाग रोपवाटिका | रोपवाटिका | • वांगी व मिरची पिकांची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मिली प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.<br>• भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन | - | • शेळ्यांमध्ये जंताचा प्रादुर्भाव आढळून येण्याची शक्यता आहे. त्यासाठी शेळ्यांना अलबेंडाझॉल ७.५ मि. ग्रॅम प्रति किलो वजनास या प्रमाणात औषध द्यावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.**